**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संयुक्त अरब अमिरातीच्या अध्यक्षांशी दूरध्वनीद्वारे चर्चा

- तृणमूल काँग्रेसच्या दोन्ही गटांना निवडणूक आयोगाकडून नवं नाव आणि पक्षचिन्ह, नंदीग्राम विधानसभा पोटनिवडणुकीतून ममता बॅनर्जींच्या उमेदवाराची माघार

- ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीसाठी भारताकडून 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची निवड

- पाकिस्तानातल्या मशीदीत झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात १६ पोलिसांसह २१ जणांचा मृत्यू, ७८ जण जखमी

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धांमधे, जपानचा धुव्वा उडवत भारताच्या महिला क्रिकेट संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश

**<><><><><><>**

संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांनी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. दोन्ही देश प्रादेशिक शांती, सुरक्षा आणि स्थिरता बळकट करण्याच्या उद्देशानं सहयोग आणि सहकार्य करण्यासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार दोन्ही नेत्यांनी केला. तसंच पश्चिम आशियातल्या घडामोडींवरही त्यांनी चर्चा केली. उर्जा, संरक्षण, गुंतवणूक आणि आरोग्य सेवांसह इतर क्षेत्रात दोन्ही देशांची धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्याबाबत दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला. अमिरातीच्या अध्यक्षांनी

प्रधानमंत्री मोदी यांना यशस्वी ब्रिक्स आयोजनाबद्दल तसंच जन्मदिनाबद्दल शुभेच्छाही दिल्या.

**<><><><><>**

सौदी अरेबियावर झालेल्या हल्ल्याचा भारतानं निषेध केला आहे आणि लाल समुद्रात वाढत असलेल्या संघर्षावर चिंता व्यक्त केली आहे. यासारख्या हल्ल्यामुळं प्रादेशिक शांतता आणि सुरक्षितता धोक्यात येते आणि ते अस्वीकारार्ह आहे असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत म्हणाले.

१९९१ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या करारानुसार समुद्रात २ देशांच्या जहाजांमध्ये किमान ३ नॉटिकल मैलाचे अंतर अपेक्षित आहे. पाकिस्तानच्या PNS हुनेन या जहाजानं या करारचं उल्लंघन करुन INS कोलकाता या भारतीय जहाजाला परवा धडक दिली. असे प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी पाकिस्तानला समज दिल्याचं ते म्हणाले. यात भारतीय जहाजाला काहीही नुकसान झालेलं नाही. याप्रकरणी पाकिस्ताननं केलेले आरोप जयस्वाल यांनी फेटाळून लावले. अमेरिकेनं रशिया आणि इराणवर निर्बंध लादण्यासाठी आणलेल्या कायद्यामुळं भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होणारे विपरीत परिणाम अमेरिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले आहेत. देशहित आणि देशातल्या नागरिकांची गरज पाहून भारत विविध देशांकडून कच्च तेल खरेदी करत राहील, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

सरकारचे विविध विभाग आणि संस्थांमध्ये नियुक्त झालेल्या ५१ हजारापेक्षा जास्त तरुणांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २०व्या रोजगार मेळ्यात उद्या नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात येणार आहे. मुंबई, ठाण्यासह देशभरात विविध ठिकाणी ४५ रोजगार मेळाव्यांचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी प्रधानमंत्री उपस्थितांना संबोधितही करतील.

**<><><><><>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या HAL, अर्थात 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड' या विमान निर्मिती कंपनीनं आज तेजसचं दोन आसनी प्रशिक्षण विमान, आणि 'HTT-40' हे मूलभूत प्रशिक्षण विमान भारतीय हवाई दलाकडे सुपूर्द केलं. बंगळुरु इथं झालेल्या या हस्तांतरण सोहळ्याला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. त्यांनी सांगितल…

**होल्ड - बाईट - राजनाथ सिंग**

'HTT-40' विमानाला राजनाथ सिंग यांनी 'अंकुर' असं नाव दिलं.
यावेळी HAL नं सार्वजनिक क्षेत्रातल्या 'पवन हंस लिमिटेड'ला चार 'ध्रुव नेक्स्ट जनरेशन' हेलिकॉप्टर्स सुपूर्द केली. HAL २०३४ पर्यंत भारतीय हवाई दलाला २९ दोन आसनी प्रशिक्षण विमानं, तसंच संरक्षण मंत्रालयाला ७० 'HTT-40' विमानं पुरवणार आहे.

**<><><><><>**

संपूर्ण मद्यबंदीमुळे अनेकदा मद्याचा व्यापार लपूनछपून चालवला जातो, असं निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयानं आज Maharashtra Poisons Rules, अर्थात राज्यशासनाच्या, विषाबाबतच्या नियमांमधल्या काही तरतुदी रद्द केल्या. या तरतुदींनुसार, विषारी मद्यामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी, औषध उत्पादक नसलेल्यांना मेथेनॉल विकण्यापूर्वी त्यात विशिष्ट रंग आणि कडू चव आणणारे घटक मिसळणं अनिवार्य होतं. मात्र हे निर्बंध मूलभूत अधिकारांचं उल्लंघन करणारं असल्याचं न्यायालयानं सांगितलं. न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पीठानं हा निर्णय दिला.

विषारी मद्यामुळे होणाऱ्या दुर्घटना रोखण्यासाठी न्यायालयानं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना विविध उपाययोजना सुचवल्या. तसंच, भेसळयुक्त मद्याचं

बेकायदेशीर उत्पादन, वाहतूक आणि विक्री रोखण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयावर आधारित दृष्टिकोन स्वीकारण्याचं आवाहन केलं.

<><><><><><>

FSSAI नं नेस्ले कंपनीच्या लहान बालकांसाठीच्या उत्पादनांच्या विरोधात कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. NAN Excella Pro Stage 1, Lactogen Pro 1, आणि follow-up formula उत्पादनांच्या विरोधात ही कारवाई आहे. यातले काही पदार्थ पचनाला सोपे असल्याचा दावा नेस्ले कंपनीनं केला आहे. हे अन्न सुरक्षेच्या संदर्भातल्या कायद्याचं उल्लंघन असल्यानं FSSAI नं नेस्लेकडून खुलासा मागवला आहे. तर देशातल्या सर्व कायद्यांचं पालन काटेकोरपणे केलं जात असल्याचं नेस्ले कंपनीनं म्हटलं आहे.

<><><><><><>

तृणमूल काँग्रेसच्या दोन्ही गटांना निवडणूक आयोगानं नवं नाव आणि पक्षचिन्ह दिलं आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातल्या तृणमूल काँग्रेसला ‘ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ असं नाव आणि ‘फुटबॉल खेळाडू’ हे चिन्ह आयोगानं दिलं आहे. तर अरूप रॉय यांच्या गटाला ‘डेमॉक्रॅटिक तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘लिफाफा’ हे निवडणूक चिन्ह देण्यात आलं आहे. मूळ तृणमूल काँग्रेस पक्षाचं नाव, तसंच फूल आणि गवत हे चिन्ह वापरायला निवडणूक आयोगानं काल पक्षाच्या दोन्ही गटांना मनाई केली होती.

<><><><><><>

ममता बॅनर्जी गटाच्या नंदीग्राम विधानसभा पोटनिवडणुकीच्या उमेदवार संचिता प्रधान डे यांनी मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांची भेट घेतल्यानंतर आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत संपण्याच्या एकदिवस आधी संचिता यांनी अर्ज मागे घेतल्यानं आता ममता बॅनर्जी गटाचा एकही उमेदवार या निवडणुकीत राहिला नाही. त्यामुळे

ममता बॅनर्जी यांनी या मतदारसंघातल्या काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला आहे. मात्र, काँग्रेसच्या नेत्यांनी ही निवडणूक स्वबळावर लढण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

<><><><><>

प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराच्या शर्यतीसाठी भारताकडून ‘गोंधळ’ या मराठी चित्रपटाची निवड झाली आहे. संतोष डावखर लिखित आणि दिग्दर्शित हा चित्रपट गोंधळ या परंपरेची कहाणी सांगतो. ३३ चित्रपटांमधून या चित्रपटाची निवड झाल्याचं निवड समितीचे अध्यक्ष पी. शेषाद्री यांनी सांगितलं. ‘श्वास’, ‘हरिश्चंद्राची फॅक्टरी’ आणि ‘कोर्ट’ नंतर ऑस्करसाठी भारताकडून पाठवलेला ‘गोंधळ’ हा चौथा मराठी चित्रपट आहे. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार मिळवण्यात आत्तापर्यंत एकाही भारतीय चित्रपटाला यश आलेलं नाही. यंदाचा ९९वा ऑस्कर सोहळा १४ मार्च २०२७ रोजी होणार आहे.

<><><><><>

पाकिस्तानच्या वायव्य भागातल्या खैबर पख्तुनवा प्रांतातल्या कोहाट जिल्ह्यात आज एका आत्मघातकी बॉम्ब स्फोटात १६ पोलिसांसह २१ जण ठार तर ७८ जण जखमी झाले. आत्मघातकी हल्लेखोरानं आपलं वाहन मशिदीच्या भिंतीवर धडकवून स्फोट घडवला. त्यानंतर दहशतवादी आणि पोलिसांनी गोळीबारही केला.इत्तेहाद अल मुजाहिद्दीन पाकिस्तान या दहशतवादी संघटनेनं या हल्ल्याची जबादारी स्वीकारली आहे.

<><><><><>

आशियाई क्रीडा स्पर्धांमधे महिला क्रिकेटमध्ये भारतानं यजमान जपानचा धुव्वा उडवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. आज निस्शिन इथं झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भारताच्या संघानं जपानवर ८ गडी आणि ९० चेंडू राखून दणदणीत मात केली. नाणेफेक जिंकून भारतानं प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला

आणि जपानचा संपूर्ण संघ १९ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये अवघ्या ५७ धावांवर तंबूत धाडला. श्री चरणीनं ४, शफाली वर्मानं २, तर श्रेयांका पाटील आणि दीप्ती शर्मानं प्रत्येकी एका खेळाडूला बाद केलं. त्यानंतर भारतानं केवळ ५ षटकांमध्ये २ खेळाडूंच्या मोबदल्यात ५९ धावा काढल्या आणि सामना जिंकला.

//<><><><><><>//